# * अधिसूचना क्र. २ /२०२२ *

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ चे कलम २८(२)(त) नुसार, संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्था यांच्या व्यवस्थापन प्रतिनिधींच्या गटाने त्यांच्यामधून अधिसभेवर निवडुन द्यावयाचे "व्यवस्थापन प्रतिनिधींचा निर्वाचक गण" (Collegium of Management Representatives / Electoral College) तयार करण्यासाठी माहिती पाठविणे बाबत ......**

विद्याविषयक स्वायत्तता व अत्युच्च गुणवत्ता, लोकशाही प्रक्रीयेव्दारे पर्याप्त प्रतिनिधीत्व, त्याचे बळकटीकरण व विनियमन यांकरीता आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींकरीता, महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, १९९४ निरसीत करुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ दि.१ मार्च, २०१७ पासून अंमलात आणण्यात आलेला आहे.

१. सदरच्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ कलम (२) मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

* कलम (२), पोट कलम १६, "व्यवस्थापन प्रतिनिधींचा गट", याचा अर्थ, जे संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा परिसंस्थांच्या व्यवस्थापन समित्यांचे प्रतिनिधी आपल्यामधून निरनिराळया प्राधिकरणांचे सदस्य म्हणून निवडून येतील अशा, संलग्न किंवा स्वायत्त महाविद्यालयांच्या किंवा परिसंस्थांच्या व्यवस्थापन समित्यांच्या प्रतिनिधींचा मिळून बनलेला निर्वाचक गण, असा आहे.

* कलम (२), पोट कलम ३७, "व्यवस्थापन", याचा अर्थ, ज्यांच्या व्यवस्थापनाखाली एका किंवा अधिक महाविद्यालयांचे किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांचे किंवा उच्च शिक्षणाच्या इतर परिसंस्थांचे संचालन करण्यात येते आणि त्यांना विद्यापीठाचे विशेषाधिकार बहाल करण्यात येतात असे, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमान्वये, नोंदणी करण्यात आलेल्या कोणत्याही विश्वस्त मंडळाचे किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या कोणत्याही संस्थेचे किंवा कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ८ अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या कंपनीचे विश्वस्त किंवा व्यवस्थापन किंवा नियामक मंडळ, मग त्याला कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो, असा आहे :

..२

परंतु, केंद्र सरकार किंवा राज्य शासन किंवा जिल्हा परिषद, नगरपरिषद किंवा महानगरपालिका यांसारखे स्थानिक प्राधिकरण यांनी स्थापन केलेल्या किंवा त्यांच्याकडून चालवण्यात येणाऱ्या कोणत्याही महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या बाबतीत, व्यवस्थापन याचा अर्थ, अनुक्रमे, यथास्थिति, केंद्र सरकार किंवा राज्य शासन किंवा जिल्हा परिषद किंवा नगरपरिषद किंवा महानगरपालिका, असा आहे ;

* कलम २८(२)(त), संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्था यांच्या व्यवस्थापन गटाने त्यांच्यामधून निवडून दयावयाचे व्यवस्थापनाचे सहा प्रतिनिधी, ज्यांपैकी किमान एक आळीपाळीने अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती, किंवा इतर मागासवर्ग या प्रवर्गातील व्यक्ती असेल आणि एक महिला असेल :

परंतु, निवडून द्यावयाचे व्यवस्थापनाचे असे प्रतिनिधी, राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेने किंवा, यथास्थिति, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाने अधिस्वीकृती दिलेल्या महाविद्यालयांच्या व्यवस्थापनाचे प्रतिनिधी असतील :

परंतु आणखी असे की, जेथे व्यवस्थापन, एक वा त्याहून अधिक महाविद्यालये किंवा परिसंस्था चालवित असेल त्याबाबतीत, अशा व्यवस्थापनाचा केवळ एक प्रतिनिधी हा व्यवस्थापन प्रतिनिधीच्या गटामध्ये समाविष्ट होण्याकरिता पात्र असेल ;

२. ज्याअर्थी, वरील कायद्याचे कलम २७ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, विद्यापीठाच्या प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्याच्या, नामनिर्देशित करण्याच्या अथवा स्वीकृत करुन घेण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने दि.२८ एप्रिल, २०१७ रोजी अधिसूचना निर्गमित करुन त्याव्दारे वरील कायद्याचे, कलम २८(२)(त) नूसार, अधिसभेवर संलग्नीत महाविद्यालय किवा परिसंस्था यांच्या व्यवस्थापन प्रतिनिधींच्या गटाने त्यांच्यामधून निवडून द्यावयाचे "व्यवस्थापन प्रतिनिधी" प्राधिकरण सदस्य म्हणून निवडून येण्यासाठीच्या पात्रता शर्ती खालील प्रमाणे विनिर्दिष्ट केलेल्या आहेत-

क. स्नातक पदवी धारण केलेला असावा

ख. व्यवस्थापनाच्या नियामक मंडळाचा / व्यवस्थापन समितीचा किमान दोन वर्ष सदस्य असावा

ग. राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे किंवा यथास्थिती राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाचे वैध प्रमाणपत्र असलेले आणि अशा प्रमाणपत्राचा वैधता कालावधी समाप्त झाला नसेल असे किमान एक महाविद्यालय किंवा परिसंस्था अशा व्यवस्थापनाकडून चालविण्यात येणारे असावे.

..३

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव-४२५००१

३. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६, चे कलम ६२(१) नुसार, विद्यापीठाच्या विद्यमान प्राधिकरणांच्या सदस्यांची मुदत दि.३१ ऑगस्ट, २०२२ रोजी संपूष्टात येत आहे. सदर कायद्याच्या कलम ६२ (२) नूसार, अधिसभेवर दि.१ सप्टेंबर, २०२२ ते दि.३१ ऑगस्ट, २०२७ या कालावधीसाठी नवनिर्वाचित सदस्यांची निवडणूक, नामनिर्देशन व स्वीकृतीची प्रक्रीया सुरु करण्यात आली असून वरील कायद्याच्या कलम २८(२)(त) विचारात घेवून कलम २(१६) नूसार, अधिसभेवर संलग्नित महाविद्यालये किवा परिसंस्था यांच्या व्यवस्थापन प्रतिनीधींच्या गटाने त्यांच्यामधून निवडून द्यावयाचे व्यवस्थापन प्रतिनिधींचा निर्वाचक गट (Collegium of Management Representatives / Electoral College) तयार करावयाचा आहे.

४. तरी, सर्व संलग्नित, संचलित व स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष / सचिव यांना, मला मा.कुलगुरु महोदयांकडुन प्राप्त झालेल्या आदेशान्वये विनंती करण्यात येते की,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ व राज्य शासनाने प्राधिकरण सदस्य म्हणुन निवडून येण्यासाठीच्या पात्रता, शर्ती, संदर्भात दि.२८ एप्रिल, २०१७ रोजी निर्गमित केलेली अधिसूचना व त्याअनुषंगाने भरुन द्यावयाचा विहित नमुना (Form B) या अधिसूचने सोबत विद्यापीठाच्या www.nmu.ac.in. या संकेतस्थळावरील university authorities election-2022 या पोर्टल वर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. कृपया त्याचे अवलोकन करुन, सर्व पात्रता धारकांनी खालील वर्णन केलेल्या दस्तऐवजांच्या प्रती सह स्वसाक्षंकीत करुन ऑनलाईन पध्दतीने सादर करावी.

१. संस्था / कार्यकारी मंडळाच्या ठरावाची प्रमाणित प्रत.
२. व्यवस्थापन प्रतिनिधी मागासप्रवर्गाचा असल्यास सक्षम अधिकाऱ्याने निर्गमित केलेला त्यांचा जातीचा दाखला व जात प्रमाणपत्र पडताळणी अहवालाची प्रत.
३. व्यवस्थापन प्रतिनिधीच्या शैक्षणिक अर्हता दर्शविणाऱ्या पदवी प्रमाणपत्राच्या प्रती.
४. संबंधित संलग्नित महाविद्यालये अथवा परिसंस्था ही राष्ट्रीय मुल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेने (नॅक) किंवा यथास्थिती, राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाने निर्गमित केलेल्या वैध प्रमाणपत्राची प्रत.
५. व्यवस्थापन प्रतिनिधी हा नियामक मंडळाचा / व्यवस्थापन समितीचा किमान दोन वर्ष सदस्य असल्याबाबतचा दाखला.

वरील प्रमाणेची संपूर्ण माहिती विहित नमून्यात, विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेत स्थळावरील *University Authorities Election-2022* या portal वर **दि.१८/०८/२०२२** वार **गुरुवार** रोजी सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत अपलोड करुन त्याची हार्ड कॉपीवर व्यवस्थापन प्रतिनिधीचा नजीकच्या काळात काढलेला पासपोर्ट साईज कलर फोटो व स्वत:ची स्वाक्षरी करुन अनुषंगिक सर्व दस्तऐवजांसह पोस्टाव्दारे/खास दुता मार्फत विद्यापीठाच्या निवडणूक शाखेकडे **दि.२२/०८/२०२२** वार **सोमवार** रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पाठवुन सहकार्य करावे. केवळ ऑनलाईन पध्दतीने माहिती पाठवून त्याची स्थळ प्रत विद्यापीठ कार्यालयात जमा न केल्यास ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेली माहिती विचारात घेतली जाणार नाही.

वरील संदर्भात विद्यापीठास जी माहिती प्राप्त होईल त्यावर विसंबून राहुन वरील कलमा अंतर्गत घ्यावयाच्या निवडणुकीचा निर्वाचक गण (Collegium of Management Representatives) तयार करुन निवडणूक प्रक्रीया अवलंबली जाईल.

सदरची माहिती ही वरील विहित कालावधीत सादर करण्याची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयाचे / परिसंस्थांचे व्यवस्थापनाचे अध्यक्ष आणि सचिव यांचीच राहील. विहित कालावधी नंतर प्राप्त होणारी माहिती विचारात घेतली जाणार नाही व त्याच्या होणाऱ्या परिणामांस विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही.

जा.क्र.कबचौउमवि/२/ ०८/संचा./२०२२
दि: १४/ ७ /२०२२

(डॉ.शा.रा.भादलीकर)
निवडणुक विभागप्रमुख
तथा उपकुलसचिव
विधी/माहितीचा अधिकार
कबचौउमवि,जळगाव

*टीप:*

(१) या संदर्भात e-mail id ***election2022@nmu.ac.in*** वर पत्रव्यवहार करणेस विनंती आहे.

(२) महाविद्यालयीन व्यवस्थापनाच्या वैधते बाबत विवाद असून एकापेक्षा जास्त व्यवस्थापनाचे प्रतिनिधींची नावे प्राप्त झाल्यास, त्यावर मा.कुलगुरु महोदयांचा निर्णय हा अंतीम राहील.

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी : (ई-मेलव्दारे)

१) मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्न व स्वायत्त महाविद्यालये आणि मान्यता प्राप्त परिसंस्था सदरची अधिसूचना ही आपल्या महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या नोटीसबोर्डावर प्रसिध्द करुन संर्व संबंधितांचे निदर्शनास आणून द्यावी.

२) जनसंपर्क अधिकारी, कबचौ उमवि, जळगाव

| FORM - B | | |
|---|---|---|
| **Information of Management Representatives of Affiliated Colleges and Recognized Institutions for Election-2022** | Application ID (for office use) | Please paste recent colour photograph of representative of Mangement (self-attested)<br><br>Signature |

To,
The Registrar, Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon-425001

**MANAGEMENT/INSTITUTE DETAILS:**

| | | |
|---|---|---|
| 1 | Name and address of Management/Institute | |
| 2 | Date and Number of Registration.<br>i) Bombay Public Trust Act, 1950<br>ii) Society Registrar Act, 1860 (attach proof)<br>iii) Companies Act, 2013 | |
| 3 | Whether Registration is continued as per above Act | Yes/No |
| 4 | Name & Establishment year of Colleges/Institutes run by the Management | |
| 5 | Present position of affiliated / recognition of Colleges / Institutes | i) Affiliation Status-Permanent /Non-permanent<br>ii) Affiliation/Recognition upto |
| 6 | Whether College/Institute is accredited by NAAC/NBA | Yes/No<br>If yes,<br>mention Accredited Grade<br>Accreditation period upto<br>…… to…….. (attach proof) |
| | (a) Whether, such certificate is expired / unexpired | Yes/No. |
| 7 | Whether College/Institute is recognized under 2(f) & 12(b) of The UGC Act. | Yes / No<br>If yes, reference no.:<br>2(f)……….<br>12(b)…………… |

..2

| PERSONAL DETAILS | | |
|---|---|---|
| 8 | Name of the person nominated as Representative of Management | Surname Full name Middle name |
| 9 | Designation in Management | |
| 10 | Qualification of person nominated (attach proof) | |
| 11 | Address | |
| | Gender | Male / Female / Transgender |
| | Phone No | |
| | email | |
| | Aadhar card no. | |
| 12 | Category | SC \| ST \| DT/NT \| OBC \| OPEN |
| 13 | Experience of nominated person as a member of Governing body/ Management Committee of the Management for last two years | …… year |
| 14 | Date of Meeting of above Nomination (attach certified copy of Resolution) | Date of Meeting<br>Resolution No. |

Name and Sign of Representative
of Management

Certified that the above information is true and correct and verified as per original record.

Place: Signature and Seal of Secretary

Date: Signature and Seal of Chairman/President

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
1990
जळगाव-४२५००१